# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI.

## DIRECTION

**No. : 33 / 2011** **Dated : 13 - 6 – 2011**

**Subject : Procedure for creation and filling the posts of Professor/s.**

Whereas, the Government of Maharashtra in Higher & Technical Education Department, Mumbai, has issued Government Resolution No. NGC 2009/(243/09)-UNI-1, dated $12^{th}$ August, 2009, regarding Revision of Pay Scales of teachers and equivalent cadres in Higher Education as per UGC Scheme ( $6^{th}$ Pay Commission), for teachers and other equivalent cadres of library and physical education in all the Universities, Colleges and other higher educational institutes coming under the purview of state legislature through the Department of Higher and Technical Education of Maharashtra and governed by the rules of University Grants Commission.

AND

Whereas, the Govt. Resolution dated $12^{th}$ August, 2009, of Higher & Technical Education Department, Mumbai, is implemented, by this university, vide Direction No. 21 / 2009, dated 17-9-2009.

AND

Whereas, UGC has issued, 'University Grants Commission (Minimum Qualifications for Appointment of Teachers and other Academic Staff in Universities and Colleges and other Measures for the Maintenance of Standards in Higher Education) Regulations, 2010', dated 28th June, 2010.

AND

Whereas, the said UGC Regulations, 2010, dated 28th June, 2010 is implemented, by this university, vide Direction No.55 / 2010, dated 18-9-2010.

AND

Whereas, Clause 2 (2) (b) of above Govt. Resolution dated $12^{th}$ August, 2009 (i.e. Direction No. 21/2009 of this university) provides criteria for creation of posts of Professor/s and procedure for filling these posts of Professor/s, in under graduate and post graduate colleges.

AND

Whereas, Clause 6.5.0., 6.5.1 & 6.5.2. of UGC Regulations, 2010, dated 28th June, 2010 (i.e. Direction No. 55/2010 of this university) provides criteria for creation of posts of Professor/s and procedure for filling these posts of Professor/s, in under graduate and post graduate colleges.

AND

Whereas, the Government of Maharashtra in Higher & Technical Education Department, Mumbai, has issued Government Resolution No. NGC-2010/(415/10)Vishi-1, dated $30^{th}$ July, 2010 and Government Circular No. NGC 2010/(415/10)-Vishi-1, dated $26^{th}$ October, 2010, regarding criteria and procedure for creation of posts of Professor/s and procedure for filling these posts of Professor/s, in under graduate and post graduate colleges.

AND

Whereas, the University has to initiate the action to frame suitable Statute, under the provisions of Section 51 of the Maharashtra Universities Act, 1994, to implement the above Govt. Resolution dated $30^{th}$ July, 2010 and Govt. Circular dated $26^{th}$ October, 2010.

Contd.....

AND

Whereas, the matter is of urgent nature and framing of Statute is likely to take some time, it is necessary to issue direction in this regard.

Therefore, to give immediate effect to the provisions contained in the above Govt. Resolution dated 30th July, 2010 and Govt. Circular dated 26th October, 2010, of Higher & Technical Education Department of Government of Maharashtra, I, Dr. Mohan Khedkar, Vice-Chancellor of Sant Gadge Baba Amravati University, under powers vested in me vide Section 14(8) of the Maharashtra Universities Act, 1994, hereby issue the following directions.

1. This direction shall be known as 'Procedure for creation and filling the posts of Professor/s, Direction, 2011.'

2. This direction shall come into force from the date of its issuance.

3. In this direction, unless the context otherwise requires;

   (a) 'Government Resolution' means 'Government Resolution No. NGC-2010/(415/10) Vishi-1, dated 30th July, 2010', hereinafter referred to as 'Government Resolution' and enclosed herewith as **Annexure-A**.
   (b) 'Government Circular' means 'Government Circular No. NGC 2010/(415/10)-Vishi-1, dated 26th October, 2010', hereinafter referred to as 'Government Circular' and enclosed herewith as **Annexure-B**.
   (c) Proforma for submitting the Information of Departments / Subjects to the university, by the colleges, for getting the concurrence of the university for filling the 25 % posts of Professors by Direct Recruitment / External Deputation / Internal Deputation, is enclosed herewith as **Annexure-C**.

4. The procedure given in the Annexure-A & Annexure-B shall be followed after receiving the information from the college in Annexure-C and the necessary concurrence or otherwise shall be communicated to the college within one month from the receipt of the proposal from the college.

**Sd/-**
**(Dr. Mohan Khedkar)**
**Vice-Chancellor**

**Place :** Amravati.
**Date :** 9 / 6 / 2011

* * * * *

**Annexure – A**

अकृषी विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये
सहयोगी प्राध्यापकांच्या एकूण मंजूर पदसंख्येच्या
१०%पदे प्राध्यापक संवर्गासाठी परिवर्तीत
(Convert) करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.एनजीसी-२०१०/(४१५/१०)विशि-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० जुलै, २०१०

वाचा : १) केंद्र शासनाच्या मनुष्य बळ विकास मंत्रालयाचे क्र.1-32/2006-U.II/U.I(i) दिनांक ३१ डिसेंबर, २००८ चे पत्र.
२) शासनाचे क्र.एनजीसी-२००९/(२४३/०९)युएमआय-१, दि.१२ ऑगस्ट, २००९ चा शासन निर्णय.

प्रस्तावना : भारत सरकारच्या मानव संसाधन विभागाच्या दि.३१ डिसेंबर, २००८ च्या आदेशानुसार केंद्रीय विद्यापीठातील शिक्षक व समकक्ष पदांना ६ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन संरचना लागू करण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत. त्याच आधारावर राज्य शासनाच्या अधिनियत्रंणाखालील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व समकक्ष पदांना ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्रशासनाच्या उक्त पत्रातील निर्देशाच्या अनुषगाने राज्य शासनाच्या क्र.एनजीसी-२००९/(२४३/०९)युएमआय-१, दि.१२ ऑगस्ट, २००९ च्या आदेशानुसार राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व समकक्ष पदांना ६ व्या वेतन आयोगानुसार मान्य झालेल्या सुधारीत वेतन संरचना लागू करण्यात आलेली आहे.

२. केंद्र शासनाच्या दि.३१ डिसेंबर, २००८ च्या आदेशातील परि.क्र.१ (बी) XVIII मधील मार्गदर्शक सूचना आणि राज्य शासनाच्या दि.१२ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयातील परि.क्र.२(२)(बी) (i) मधील निर्देशानुसार संलग्नित पदवी महाविद्यालयामध्ये सहयोगी प्राध्यापकांच्या एकूण मंजूर पदसंख्येच्या १०% पदे प्राध्यापकांची असतील असा निर्णय घेतला आहे त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे आहे :-

"(i) Ten percent of the number of sanctioned posts of Associate Professor in an Under Graduate College shall be that of Professors and shall be subject to the same criterion for selection / appointment as that of Professors in Universities, provided that there shall not be more than one post of Professor in each Department ; and provided further that One-fourth (25%) of the posts of Professor in UG Colleges shall be directly recruited or filled on deputation by eligible teachers and the remaining three-fourths (75%) of posts of Professors shall be filled by merit promotion from among eligible Associate Professors of the relevant department of the Under Graduate college. Identification of posts of Professor in an Under Graduate College for being filled through direct recruitment / deputation shall be within the competence of the University acting in consultation with the College. Where the number of posts of Professor worked out as a percentage of the number of posts of Associate Professor for merit promotion or direct recruitment / deputation is not an integer, the same shall be rounded off to the next higher integer."

३. ज्या सहयोगी प्राध्यापकाची (Associate Professor ) सेवा ३ वर्षे पूर्ण झालेली आहे आणि ज्यांचे वेतन रु.९०००/- च्या ग्रेड पे मध्ये असून ज्यांनी पीएच.डी.ची पदवी संबंधीत विद्याशाखेमध्ये प्राप्त करुन घेतलेली आहे. अशाच सहयोगी प्राध्यापकांची (Associate Professor ) नियुक्ती विद्यापीठ अनुदान आयोगाने व संबंधीत विद्यापीठाने विहीत केलेल्या अटी व शर्ती आणि पात्रता धारण करणारी सेवाजेष्ठ व्यक्ती / उमेदवार विभागनिहाय अधिकतम १ या प्रमाणे प्राध्यापक (Professor) म्हणून नियुक्त करण्यात येईल. या सर्व पात्रता व विहीत अटींची पूर्तता न करणाऱ्या अध्यापकाची नियुक्ती अथवा पदोन्नती, प्रोफेसर म्हणून केल्या जाणार नाही. प्रोफेसर पदाची वेतनश्रेणी रु.३७४००-६७००० या वेतनश्रेणीमध्ये रु.१००००/- एवढे ग्रेड पे असेल.

४. सदर पदांवरील ( प्रोफेसर आणि विभागप्रमुख ) नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने सर्व संबंधित विद्यापीठांनी व संलग्नित महाविद्यालयांनी त्यांच्या परिनियम (Statutes ) आणि विनियम (Ordinance ) मध्ये आवश्यकते नुसार सुधारणा करण्याबाबत महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,१९९४ मधील कलम ८(१) व (४) खालील तरतुदीप्रमाणे सविस्तर निर्देश / सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## : शासन निर्णय :

५. सदर प्रकरणी सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन शासन पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

(i) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाच्या कुठल्याही विभागामध्ये फक्त एकच प्रोफेसराचे पद असेल. सदर प्रोफेसराचे पद त्या महाविद्यालयातील एकूण सहयोगी प्राध्यापकाच्या (Associate Professor ) संख्येच्या १०% राहणार असून त्यापैकी २५% पद हे सरळसेवा नियुक्तीने (Direct Recruitment ) अथवा प्रतिनियुक्तीने (Deputation) भरण्यात येईल आणि उर्वरीत ७५% पदे (तीन चतुर्थांश पदे ) हे एकूण गुणवत्तेच्या निकषा वरुन विभागनिहाय अधिकतम १ या प्रमाणे सेवाज्येष्ठ पात्रताधारक सहयोगी प्राध्यापकांमधून भरण्यात येईल. तथापि, सहयोगी प्राध्यापकाच्या संख्येनुसार विहीत गुणवत्तेवर आधारीत पदोन्नतीने अथवा सरळसेवा भरतीने / प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी प्राध्यापक (Professor ) पदांची संख्या निश्चित करतांना ती पुर्णांकात नसेल तर ती पुढच्या पुर्णांकात (Integer) धरण्यात यावी.

(ii) सदर संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापकांची (Professor) २५% पदे सरळसेवा भरतीने किंवा प्रतिनियुक्तीने (बाहय अथवा अंतर्गत उमेदवारांपैकी ) भरावे हे ठरविण्याचे (Identification of post ) अधिकार संबंधित महाविद्यालयाशी सल्ला मसलत करुन संबंधित विद्यापीठाने निर्णय घ्यावा.

(iii) अशासकीय अनुदानीत पदवी महाविद्यालयाकरीता शासनाने मंजूर केलेल्या सहयोगी प्राध्यापकाच्या (पूर्वीचे प्रवाचक प्रपाठक ) पदसंख्येच्या १०% वरील उपपरिच्छेद (i) मधील पूर्णांका बाबतीच्या आधीन राहून प्राध्यापक संवर्गामध्ये परिवर्तीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

(iv) संदर्भाधीन क्र.२ येथील दि.१२ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयातील परि.क्र.२ (२)(ब) मध्ये नमूद केलेल्या उक्त तरतूदींच्या आधारे सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापकांची (Associate

Professor) **एकूण शासन** मान्य संख्या **विचारात** घेऊन प्राध्यापकांच्या (Professor) पदांची **संख्या निश्चित करुन** सर्व संबंधीत महाविद्यालयास व विद्यापीठास एक महिन्यात **कळवावे.**

(v) (अ) **विभागीय** सहसंचालकांनी अनुक्रमे पदोन्नतीने व सरळ सेवेने / प्रतिनियुक्तीने **भरण्याच्या पदांची** संख्या निश्चिती करुन दिल्यानंतर त्या प्रमाणे पदोन्नतीने **प्राध्यापकांची** पदे भरण्याची कार्यवाही सर्व संबंधित महाविद्यालयांनी तात्काळ करावी. पात्रता धारक संबंधित सहयोगी प्राध्यापकांना त्यांच्याच जागेवर पदोन्नती मिळणार असल्याने त्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे शक्य व अपेक्षित आहे.

(ब) तसेच, सरळ सेवेने / प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदांची निश्चिती (Identification) करुन सदर पद कोणत्या पध्दतीने, म्हणजेच प्रतिनियुक्तीने (बाहय अथवा अंतर्गत उमेदवारांपैकी) अथवा सरळ सेवेने भरावयाची आहे ते संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठाकडून ठरवून घ्यावे. ते ठरविताना बाहय प्रतिनियुक्तीवर अथवा सरळ सेवेने भरावयाचे असेल तर त्यासाठी सम प्रमाणात सहयोगी प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याचे खात्री करावी. व सरळ सेवेसाठी शासकीय धोरणानुसार SC/ST/DTNT/OBC वर्गासाठी आवश्यकतेनुसार जागा राखीव ठेवण्याची आवश्यक ती काळजी घ्यावी. अंतर्गत प्रतिनियुक्तीने (Internal deputation) सदर पदे भरावयाची असेल तर रिक्त पदांची आवश्यकता नाही, हे लक्षात घ्यावे.

(क) अशा प्रकारे नियुक्त प्राध्यापक (Professor) संबंधित महाविद्यालयातील त्या त्या विभागात सहयोगी प्राध्यापकांपेक्षा (Associate Professor वरिष्ठ पदावर असल्याने विभागात सर्वात सेवाजेष्ठ म्हणून धरण्यात येतील व त्यांना विभागप्रमुख (H.O.D.) म्हणून गणण्यात येईल.

(vi) सदर प्राध्यापकांची पदनिश्चिती करतांना शासनाने मंजूर केलेल्या एकूण शिक्षकीय पदांच्या संख्येत कोणतीही वाढ होणार नाही याची दक्षता संबंधित विभागीय सहसंचालकांनी घ्यावी.

(vii) सदर पदांवरील (प्रोफेसर आणि विभागप्रमुख) नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने सर्व संबंधित विद्यापीठांनी व संलग्नित महाविद्यालयांनी त्यांच्या परिनियम (Statutes) आणि विनियम (Ordinance) मध्ये आवश्यकते नुसार सुधारणा (Amendment) करण्यात याव्ी.

६. या शासन निर्णयातील तरतुदी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठाच्या अधिक्षेत्रातील उच्च शैक्षणिक संस्था आणि अशासकीय अनुदानीत तसेच व्यवसायिक पदवी महाविद्यालयांना लागू राहतील.

७.     सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharshtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्र. २०१००७३०११४३२७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा.गो.जाधव)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
राज्यपाल व कुलपतींचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
कुलगुरु सर्व अकृषि विद्यापीठे,
मुख्यमंत्र्यांचे सचिव
उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे
सर्व विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
सर्व विभाग सहसंचालक, तंत्रशिक्षण
महालेखापाल-१ (लेखा विभाग), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / निवासी लेखा परीक्षा अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव

**Annexure – B**

अकृषि विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये सहयोगी प्राध्यापकांच्या एकूण मंजूर पदसंख्येच्या १०% पदे प्राध्यापक संवर्गासाठी परिवर्तीत (Convert) करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन परिपत्रक क्र.एनजीसी २०१०/(४१५/१०)-विशि-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१०.

**वाचा :** (१) केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे क्र.१-३२/२००६-U.II/U.I(i) दिनांक ३१ डिसेंबर, २००८ चे पत्र.
(२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण क्र.एनजीसी २००९/(२४३/०९/)-युएनआय-१, दिनांक १२ ऑगस्ट, २००९.
(३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण क्र.एनजीसी २०१०/(४१५/१०)-विशि-१, दिनांक ३० जुलै, २०१०.

**शासन परिपत्रक**

संदर्भाधीन अनु.क्र.३ येथील दिनांक ३० जुलै, २०१० च्या शासन निर्णयानुसार शासनाने अकृषि विद्यापीठांशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतील सहयोगी प्राध्यापकांच्या पदांपैकी १०% पदे रु.३७४००-६७००० या वेतनश्रेणीत किमान वेतन रु.४३०००/- व ग्रेड पे रु.१००००/- यावर प्राध्यापकांच्या पदात रुपांतरीत करण्यास काही अटींच्या अधीन राहून मंजूरी दिलेली आहे.

२. सदर दि.३० जुलै, २०१० च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद ५ (iv) मधील तरतूदीनुसार विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण यांना संदर्भाधीन अनु.क्र.१ व २ मधील केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे दि.३१-१२-२००८ चे पत्र व शासनाचे दि.१२ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार दि.३० जुलै, २०१० च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र.५(i) व ५(ii) मधील तरतूदीनुसार त्यांच्या नियंत्रणाखालील अनुदानित अशासकीय पदवी महाविद्यालयांना प्राध्यापकांची किती पदे अनुज्ञेय आहेत हे निश्चित करावयाची आहेत.

३. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, गुणवत्तेवर आधारीत व सरळ भरतीने / प्रतिनियुक्तीने भरावयाच्या प्राध्यापकांची पद संख्या निश्चित करताना अपूर्णांकित आकड्यांचे पूर्णांकीत आकड्यात रुपांतर कशा पध्दतीने करावयाचे आहे त्यावर स्पष्टीकरण, शक्यतो उदाहरणासह होणे आवश्यक आहे

४. त्यास अनुसरुन सहयोगी प्राध्यापकाच्या पदाचे प्राध्यापकाच्या पदात रुपांतर करताना अपूर्णांकांना पूर्णांकात कसे परिवर्तीत करावयाचे आहे त्यावर खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे :-

टप्पा १ :- संबंधित महाविद्यालयाच्या एकूण सहयोगी प्राध्यापकांची मंजूर पदे निश्चित करा (अ)

टप्पा २ :- (अ) चे १०% निश्चित करा, जो पूर्णांकात असेल किंवा नसेल ...(ब)

टप्पा ३ :- गुणवत्तेवर आधारीत पदोन्नतीचा कोटी खालीलप्रमाणे काढा :

(ब) X ०.७५ = (क)

जर (क) पूर्णांकात नसेल तर त्याला पुढील पूर्णांकात परिवर्तीत करा.

जो गुणवत्तेवर आधारित पदोन्नतीचा कोटा असेल (क-१)

टप्पा ४ :- सरळ भरतीने/प्रतिनियुक्तीने भरावयाचे पदोन्नतीचा कोटा खालीलप्रमाणे काढा :-

(ब) X ०.२५ = (ड)

जर (ड) पूर्णांकात नसेल, तर त्याला पुढील पुर्णांकात परिवर्तीत करा. जो सरळसेवा भरतीने / प्रतिनियुक्तीने भरावयाचा पदोन्नतीचा कोटा असेल.(ड-१)

वर स्पष्ट केल्याप्रमाणे संबंधित महाविद्यालयासाठी गुणवत्तेवर आधारित पदोन्नतीची पदे (क-१) आणि सरळ सेवा भरतीने/प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदोन्नतीची पदे (ड-१) प्रमाणे असतील.

५. वरील स्पष्टीकरण खालील तक्त्याद्वारे अधिक स्पष्ट करण्यात येत आहे :-

| उदाहरण | सहयोगी प्राध्यापकाची मंजूर पदसंख्या | मंजूर सहयोगी प्राध्यापक पदांच्या १०% | गुणवत्तेवर आधारीत पदोन्नतीने भरावयाचा कोटा (७५%) | | सरळसेवेने / प्रतिनियुक्तीने भरावयाचा कोटा (२५%) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | काढल्या प्रमाणे | पूर्णांकात | काढल्या प्रमाणे | पूर्णांकात |
| I. | ०८ | ०.८० | ०.६० | १ | ०.२० | १ |
| II | १२ | १.२० | ०.९० | १ | ०.३० | १ |
| III | १६ | १.६० | १.२० | २ | ०.४० | १ |
| IV | २० | २.०० | १.५० | २ | ०.५० | १ |
| V | २४ | २.४० | १.८० | २ | ०.६० | १ |
| VI | २६ | २.६० | १.९५ | २ | ०.६५ | १ |
| VII | २७ | २.७० | २.०२५ | ३ | ०.६७५ | १ |
| VIII | ३० | ३.०० | २.२५ | ३ | ०.७५ | १ |
| IX | ३६ | ३.६० | २.७० | ३ | ०.९० | १ |
| X | ४० | ४.०० | ३.०० | ३ | १.०० | १ |
| XI | ४१ | ४.१० | ३.०७५ | ४ | १.०२५ | २ |
| XII | ४८ | ४.८० | ३.६० | ४ | १.२० | २ |
| XIII | ५६ | ५.६० | ४.२० | ५ | १.४० | २ |
| XIV | ६० | ६.०० | ४.५० | ५ | १.५० | २ |

६. वरीलप्रमाणे विभागीय सह संचालकांनी त्यांच्या नियंत्रणाखालील प्रत्येक अनुदानित पदवी महाविद्यालयासाठी गुणवत्तेवर आधारीत व सरळसेवेने / प्रतिनियुक्तीने भरावयाच्या प्राध्यापकांच्या

पदांची संख्या निश्यित करुन ते, इतर अनुषंगिक सूचनांसह संबंधित महाविद्यालयांना तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्यास कळवावे व त्याची प्रत संबंधित विद्यापीठांना पाठवावी.

७. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०१०१०२६१५४९४३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( विकास तु. कदम )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,
३) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
४) मा. मंत्री (उ. व तं.शि.) यांचे खाजगी सचिव,
५) मा. राज्यमंत्री (उ. व तं.शि.) यांचे खाजगी सचिव
६) सर्व कार्यासन अधिकारी, उ. व तं. शि., मंत्रालय, मुंबई,
७) मा. सचिव (उ. व तं.शि.) यांचे स्वीय सहायक
८) निवड नस्ती.

**Annexure – C**

# Proforma for submitting the Information of Departments / Subjects to the university, by the colleges, for getting the concurrence of the university for filling the 25 % posts of Professors by Direct Recruitment / External Deputation / Internal Deputation.

**Name of the College** : ____________________________________________

**Address** : ____________________________________________

____________________________________________

## Courses run by the College

| | Grant-in-Aid Courses | Non-Grant Courses |
|---|---|---|
| **U.G.** | | |
| **P.G.** | | |

## Information of Departments / Subjects

**(Give details of all Subjects / Departments)**

| Name of the Department/ Subject | Grant / Non-Grant | Names of the Teachers | Qualifi-cations | Experience (Full-Time Approved by the University) | | Caste Category | Research Contribution in terms of API score in Category III (Entire service period) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | U.G. | P.G. | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

Contd.....

**Strength (Merit) of the Department for which Professor Post is to be allotted :**

______________________________________________________________________
______________________________________________________________________
______________________________________________________________________
______________________________________________________________________
______________________________________________________________________

**Recommendation of the Principal :**

**On the basis of above information, I hereby recommend to assign this post / these posts to the following department/s for filling up by Direct Recruitment / Internal Deputation / External Deputation.**

**1)** ______________________________

**2)** ______________________________

**3)** ______________________________

**Signature :** ______________________

**PRINCIPAL**

(Stamp)

**Note : If the post is to be filled by direct recruitment / external deputation, the information of the available work load as indicated in the staff justification, approved by the Joint Director (Higher Education.), Amravati, should be provided.**